
महाराष्ट्र पोलीस
शिरुर पोलीस स्टेशन
(पुणे ग्रामीण) ०२१३८-२२२१३९

**प्रेस नोट ३१/१०/२०१९**

**शिरूर पोलीस स्टेशन कडील तपास पथक यांचेकडुन चार दिवसात दरोडाचा गुन्हा उघडकीस आणण्यात यश शिरूर पोलीस स्टेशनची तपास पथकाची कामगीरी**

---

दिनांक २६/१०/२०१९ रोजी कवठे येमाई ता.शिरूर जि.पुणे येथे नुरमहमद बाबन पठाण वय.६० वर्षे यांचे राहते घरात अज्ञात ५ इसमांनी घराचा दरवाजा कटावणीने उघडुन आत प्रवेश करून फिर्यादी व पत्नी झोपलेले रुम मध्ये जावुन त्यांनी कटावणीने व हातानी व लाथाबुक्यानी मारहाण करून त्यांचे घरातील कपाटील दागीने व रोख रक्कत व फिर्यादी यांचे पत्नीचे अंगावर असणारे दागीने दरोडा टाकुन चोरी करून घेवुन गेले होते त्याचप्रमाणे साक्षीदार प्रकाश गणाजी इचके यांचे घरी सुध्दा त्याच रात्री चोरी झाली होती व त्यांचे घरातील दागीने व रोख रक्कम तसेच भरत देवराम भोर यांचे डेअरीत चोरीचा प्रयत्न करून शशीकांत दगडु पळसकर यांचे घरातील कपडे चोरी करून एकुण ७३,३००/- रूपयेची दागीने व रोख रक्कम घेवुन गेले होते वैगरे मजकुरावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा. श्री संदिप पाटिल सो. पोलिस अधिक्षक पुणे ग्रामिण, मा. श्री जयंत मिना सो. अप्पर पोलिस अधिक्षक सो बारामती, श्री ऐश्वर्या शर्मा सो. मा. उपविभागिय पोलिस अधिकारी दौंड, पोलिस निरिक्षक श्री प्रविन खानापुरे सो. शिरूर पोलिस स्टेशन यांना गुन्हाची माहिती दिली त्यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही लागलीच गुन्हयाचे तपासाला सुरूवात करून पोलिस निरिक्षक प्रविण खानापुरे, पोलीस नाईक संजु जाधव ब.नं १४९९, पो.कॉ संजय साळवे ब.नं २७७६, पो. कॉ विजय जंगम ब.नं २८१८ असे सदर गुन्हयातील सी.सी.टी.व्ही फुटेजच्या आधारे गुन्हयातील फरारी आरोपींचा शोध घेतला असता इसम नामे प्रविन नरेश काळे वय.२१ वर्षे रा. सुलाखेवाडी निघोज ता.पारनेर जि.अहमदनगर यास सदर गुन्हयात ताब्यात घेतले असुन त्यांने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास करून चार दिवसात गुन्हयातील वरील आरोपी निष्पन्न करून अटक करण्यात आली असुन गुन्हयांचा पुढील तपास पो.स.ई पालवे सो हे करीत आहे

**सदर आरोपी विरोधात शिरूर पोलीस स्टेशन येथे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) शिरूर पोलीस स्टेशन गु.र.नं ७४८/२०१९ भा.द.वि.कलम ३९५
२) शिरूर पोलीस स्टेशन गु.र.नं २३९/२०१९ भा.द.वि.कलम ३९४
(सदर गुन्हा घडलेपासुन आरोपी फरार होता)
३) पारनेर पोलीस स्टेशन गु.र.नं १५४/२०१३ भा.दा.वि.कलम ३८०,३४
४) पारनेर पोलीस स्टेशन गु.र.नं २६९/२०१७ भा.द.वि.कलम ३२४,३२३
५) नगर तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं २०४/२०१३ भा.द.वि.कलम ४५७,३८०,५११,३४